# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०२.१२.२०२२**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (२६.११.२०२२ ते ०२.१२.२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०३.१२.२०२२ ते ०७.१२.२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | ०१ | ०२ | दिनांक | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ |
| ० | ० | ० | ० | ० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ३ | ५ | ० | ० | ० |
| ३२.५ | ३२.५ | ३३.२ | ३३.५ | ३३.२ | ३३.५ | ३३.२ | कमाल तापमान (अं.से.) | ३०.० | ३१.० | ३२.० | ३१.० | ३०.० |
| १८.५ | १९.० | १९.२ | १९.८ | १७.५ | १६.६ | १८.५ | किमान तापमान (अं.से.) | १९.८ | १९.७ | १९.३ | १८.३ | १८.२ |
| २ | ८ | ४ | ५ | ५ | १ | ० | स. ढग स्थिती (आकाश) | ५ | ४ | ५ | ३ | ३ |
| ४ | ५ | ६ | ६ | ० | ० | - | दु. | | | | | |
| ८२ | ७९ | ७८ | ७९ | ९१ | ८१ | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७६ | ७३ | ७२ | ६७ | ६५ |
| ५५ | ६५ | ६५ | ६८ | ५९ | ७० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४३ | ५० | ५० | ४३ | ४५ |
| १ | ० | ० | ० | ० | ०.७ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ५ | ७ | ९ | ९ | ११ |
| द.आ. | नै. | ई. | ई. | ई. | पु.ई. | ई. | स. वाऱ्याची दिशा | आ. | पु.आ. | पु.आ. | पु. | पु.ई. |
| आ. | उ. | उ. | उ.ई. | उ. | उ. | - | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १५२९.६ | ८४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ३ ते ७ डिसेंबर दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे तसेच दिनांक ३ व ४ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३०.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १८ ते २० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६५ ते ७६% तर दुपारची सापेक्ष आद्रता ४३ ते ५०% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते ११ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ६ ते १२ डिसेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान तसेच कमाल तापमान व किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट ई.च्या अंदाजासाठी “दामिनी” हे अँड्रॉइड मोबईल अ‍ॅप डाऊनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| **संदेश** | | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक ३ व ४ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठेवावा. |
| **गहू** | मुकुट मुळे फुटणे | ➢ गहू पिकास ३ आठवडे पूर्ण झाले असल्यास नत्र खताचा उर्वरित हप्ता @ ६० किलो नत्र प्रती हेक्टर हा खुरपणी नंतर व पहिले पाणी देण्याच्या वेळी द्यावा. |
| **रब्बी ज्वारी** | शाखीय वाढ | ➢ रब्बी ज्वारी पेरणीनंतर १ महिना झालेला असल्यास बागायती मध्यम जमिनीसाठी ४० किलो नत्र प्रती हेक्टरी या प्रमाणात द्यावे. |
| **हरभरा** | शाखीय वाढ | हरभरा पिकावरील घाटेअळीचे नियंत्रण<br>➢ नियंत्रणासाठी १५ ते २० मिटर अंतरावर एक याप्रमाणे हेक्टरी ५० ते ६० पक्षी थांबे उभारावेत<br>➢ नियंत्रणासाठी हेक्टरी १० ते १२ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत. |
| **सुर्यफुल** | शाखीय वाढ | ➢ बागायती सुर्यफुल पिक पेरणीनंतर ३० दिवस पूर्ण झाले असल्यास नत्र खताचा उर्वरित हप्ता हेक्टरी ३० किलो या प्रमाणात द्यावा. |
| **ऊस** | वाढीची | खोडकीडीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना<br>➢ ट्रायकोग्रामा चीलोनिस (ट्रायकोकार्ड्स) ५ ते ६ प्रती हेक्टर १५ दिवसांच्या अंतराने वापरावेत. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | ➢ कामगंध सापळे ई.एस.बी. ल्युर @ ५ प्रती हेक्टर या प्रमाणात लावावेत. |
| **कांदा** | वाढीची | ➢ कांद्यावरील फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी पिकावर लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ % ई.सी. ६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून या कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. कीटकनाशकाची फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा. |
| **आंबा** | पालवी | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावर तुडतुडे कीड आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एल.एल.३ मिली + सल्फर ८० डब्ल्यूपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ हिवाळ्यामध्ये शेळ्या व मेंढ्या यांच्या चरण्याच्या वेळा बदलणे अत्यंत आवश्यक आहे कारण त्यावेळेस सकाळचे दव चाऱ्यावर पडलेले असते शेळ्या व मेंढ्यांना त्यामुळे श्वसन संस्थेचे व पचन संस्थेचे आजार होऊ शकतात त्यामुळे जनावरांना चारावयास नेताना सकाळी ९ नंतर व सूर्यास्तापूर्वी यादरम्यान चारावयास न्यावे. |

ठिकाण : ०२.१२.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**